| MHBI100023002022 | <u>**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५२७/२०२२ मधील निशाणी क्र.३० वरील आदेश**</u> |
| --- | --- |

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. ४ व ५ यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत यांचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर आपले म्हणणे सादर करत, अर्जास विरोध करत नामंजुर करण्याची मागणी केली.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वाटणी करुन वेगळा ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्यास विलंब झालेला आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्याविरुध्द पारित झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना कैफियत दाखल करण्यास केलेला उशीर त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

(१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विनाकैफियतीचा आदेश रक्कम रुपये १००/- च्या खर्चावर रद्द करण्यात येत असुन वादीला खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

(३) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी सोसावा.

सही/-

(ए.टी. जगताप)

दिनांकः- १७.०२.२०२४.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर, केज.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

Dictated on : 17.02.2024

Transcribed on : 17.02.2024

Checked & signed on : 17.02.2024

Sd/-
(S.Y. Gore)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.